महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने धारण केलेल्या जमिनीवरील अकृषिक आकारणी आणि वाढीव जमिन महसूलाच्या आकारणीबाबत.

महाराष्ट्र शासन
शासन परिपत्रक क्र. एनएए १०९३/१७१५८५/[३७]ल-५
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- ~~३१ मे, १९९५~~ ८ जून ९५

शासन परिपत्रक:-

महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ६० नुसार कोणत्याही जमिनीवर आकारला जाणारा महसूल हा त्या जमिनीचा वापर लक्षात घेऊन आकारला जातो. कलम ६७ मध्ये जमिनीच्या वापराची प्रयोजने खालीलप्रमाणे नमूद केलेली आहेत.

अ] शेतीच्या कारणासाठी

ब] राहण्यासाठी

क] उद्योगधंद्यासाठी

ड] व्यापाराच्या कारणासाठी

ई] कोणत्याही इतर कारणासाठी

२. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांनी शासनाकडे एक निवेदन पाठवून त्यात वखार महामंडळाने धारण केलेल्या जमिनीचा उपयोग औद्योगिक कारणासाठी अथवा वाणिज्यिक कारणासाठी केला जात नसल्याचे नमुद केले आहे. तसेच वखार महामंडळाने धारण केलेल्या जमिनीचा उपयोग जनतेच्या व विशेषत: शेतक-यांच्या सोयींच्या दृष्टीने वखार केंद्रे सुरु करुन शेतमालाच्या, शेतीयुक्त वस्तुंचा व इतर औद्योगिक वस्तुंचा साठवूणकिसाठी सुविधा निर्माण करण्यासाठी केला जातो असे स्पष्ट करुन राज्यामध्ये काही ठिकाणचे तहसिलदार महामंडळाने धारण केलेल्या जमिनीचा वापर "कोणत्याही इतर कारणासाठी" असे प्रयोजन समजून आकारणी करतात तर काही ठिकाणचे तहसिलदार "वाणिज्यिक" प्रयोजनासाठी वापर समजून आकारणी करतात, असे नमूद केले आहे. तथापि सदर जमिनीवर "कोणत्याही इतर प्रयोजनासाठी वापर" हे प्रयोजन समजून अकृषिक आकारणी करावी, अशी विनंती केली आहे. तसेच वखार महामंडळाने धारण केलेल्या जमिनी या वेगवेगळया ठिकाणी असून प्रत्येक ठिकाणच्या जमिनीचे क्षेत्र ३ ते ५ एकरापर्यंत आहे. मात्र महामंडळाने धारण केलेल्या जमिनीचे एकुण क्षेत्र १२ हेक्टरपेक्षा [illegible] असल्यामुळे ते सर्व एकूण क्षेत्र विचारात घेऊन वाढीव जमिन महसूलाची आकारणी केली जाते. त्यामुळे अकृषिक आकारणी + १०० टक्के जमिन महसूल अशी दूप्पट रक्कम महामंडळाला द्यावी लागते. तरी जमिनीचे क्षेत्र वेगवेगळे

17 JUN 1995

.....२

विचारात घेऊन आकारणी करावी, अशीही महामंडळाने विनंती केली आहे.

३. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने उपस्थित केलेले मुद्दे शासनाने तपासले असून सदर जमिनीचा उपयोग वाणिज्यिक प्रयोजनासाठीच होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे वखार महामंडळाने धारण केलेल्या जमिनीवर महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ११४ "क" प्रमाणे आकारणी करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे आकारणी केली जात नसेल तर तशी आकारणी करण्याची कार्यवाही जिल्हाधिका-यांनी त्वरीत करावी.

४. महाराष्ट्र वाढीव जमिन महसूल आणि विशेष आकारणी कायदा १९७४ चे कलम ३ नुसार जमिन धारक १२ हेक्टर किंवा त्यापेक्षा जास्त जमिन धारण करीत असेल तर त्याला अकृषिक आकारणी शिवाय जमिन महसूलाच्या १०० टक्के इतकी अतिरिक्त आकारणी केली जाते. महामंडळाने धारण केलेल्या जमिनीचे एकूण क्षेत्र विचारात घेता उपरोक्त तरतुदींच्या अनुषंगानेच आकारणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे वखार महामंडळाने उपस्थित केलेला वरील मुद्दा गैरलागू आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(सही)
[ रा. सो. स्वर्गीया ]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति, :-